साप्ताहिक
# आवाज भंडारा

मुख्य संपादक : नौशिया खान
कार्यकारी संपादक : पवन मस्के

● वर्ष -०४ ● अंक - ०४ ● बुधवार दि.२२ जनवरी २०२५ ● RNI No.-MAHBIL/2021/80357 ● पृष्ठ -४ मुल्य -२ रु. ● Gmail-awazbhandara@gmail.com

# मेघा के मौत के बाद वीर्ली महामार्ग पर 5 घंटे रहा चक्का जाम आंदोलन

## सांसद डॉक्टर प्रशांत पाडोले ने मेघा के परिजनों को न्याय मिलने हेतु आंदोलन में लिया सहभाग

## सांसद ने बताया कि दोषी डॉक्टरों पर कार्रवाई की मांग की गई है

## पुलिस अधीक्षक नूरूल हसन ने परिजनों को उनकी मांग का आश्वासन देकर आंदोलन किया खत्म

## शल्य चिकित्सक डॉ सोयम ने मेघा के परिजनों को न्याय देने के लिए मानदन देने की बात कही

## सरकारी अस्पताल से लेकर निजी अस्पताल में उपचार की जांच होगी और दोषी पाने पर होगी कार्रवाई ?

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**

भंडारा : जिले के लाखांदूर तहसील अंतर्गत आने वाले वीर्ली गांव की मेघा अशोक बनारसी का सारंडी आरोग्य केंद्र के शिविर में कुटुंब नियोजन का ऑपरेशन किया गया था पर दो दिन बाद मेघा के पेट में दर्द होने से भंडारा जिले के जिला रुग्णालय में भेजो गया.

परंतु परिजनों ने उसे भंडारा के निजी अस्पताल श्री साइन मल्टी स्पेशल अस्पताल में भर्ती कराया जहां उसका 15 दिन उपचार शुरू रहा मेघा को स्वस्थ कर अस्पताल से छुट्टी दे दी गई लेकिन उसकी तबीयत और खराब होने से डॉक्टर जम्बुलकर और उसके बाद ब्रह्मपुरी के आस्था अस्पताल में उसका उपचार शुरू रहा.

18 जनवरी को उसे नागपुर के मेडिकल कॉलेज में भर्ती कराया जहां उसका उपचार के दौरान मृत्यु हो गई जिसके बाद उसका पोस्टमार्टम के पश्चात 19 जनवरी को परिजनों ने उसका शिवाला कर बर्ली गांव के राजमार्ग पर रास्ता जमकर आंदोलन शुरू किया.

इसकी जानकारी भंडारा गोंदिया जिले की संसद द डॉक्टर प्रशांत पडोले को मिलते ही सांसद ने मेघा के परिजनों से मुलाकात कर आंदोलन में सहभागी लिया साथी मेघा के परिवार के सहयोग में अन्य गांव के लोगों ने भी सहभागी लिया इस आंदोलन को तीव्र होता देख संबंधित अधिकारियों ने वह पुलिस बनने वह पुलिस बल्ले आंदोलन वह पुलिस बल्ले आंदोलन कताओं से बातचीत की



आंदोलन करता हूं कि मांगे पूरी होने पर मौके पर रात में शल्य चिकित्सा डी एच ओ पुलिस अधीक्षक अपर पुलिस अधीक्षक थानेदार मौके पर मौजूद रहे और आंदोलन कताओं की मांग पूरी सुनकर उन्हें आश्वासन दिया कि उनकी मांगे जल्द पूरी की जाएगी रात करीब 10 से 11:00 के दरमियान आंदोलन कताओं ने आंदोलन समाप्त कर मेघा के शो का अंतिम संस्कार किया इस विषय को संसद पाडोले ने विस्तार में जानकारी दी लिए जानते हैं कि क्या थी घटना और क्या हुआ था बेस क्रीम म इंडिया न्यूज ने पार्ट वन से लेकर पार्ट 5 तक मेघा की हर परिस्थिति के बारे में और संबंधित अधिकारियों और डॉक्टरों की मुलाकात कर जानकारी दी है ताकि मेघा के साथ जो अन्याय हुआ है वह आम जनता तक पहुंचे और दोषियों पर कार्रवाई हो इस खबर के माध्यम से आम जनता को मालूम होना चाहिए कि मेघा के साथ आखिर क्या हुआ था खबर में साफ-साफ दोषी नजर आ रहे हैं आने वाले पाठ में देखिए की किस तरह से मेघा के परिजनों से वसूली करने के बावजूद भी उपचार नहीं किया गया इसका बड़ा खुलासा बीएस क्राइम इंडिया न्यूज करने जा रही है



अगर पेशेंट सरकारी दवाखाने में अगर रहता तो उसके उपचार अच्छे से अच्छा इलाज करके वहां किए रहते लेकिन अगर सरकारी दवा खाने में यह पेशेंट का इलाज अच्छा नहीं हुआ रहता तो लोग हमारे ऊपर आ जाते चढ़ जाते लेकिन वहां प्राइवेट में अगर हुआ तो वहां कोई यह नहीं कुछ भी बोलते अगर सरकारी वाले पर डॉक्टर की गलती है तो उसके ऊपर भी कार्रवाई होना चाहिए और प्राइवेट और डॉक्टर के तरफ भी अगर इलाज नहीं हुआ अच्छे से तो उसकी भी जांच होना चाहिए और पूरा-पूरा सच का सच बाहर आना चाहिए.

-डॉ. चन्द्रसुरेश डोंगरवार



मी डॉक्टर पंकज लडके आस्था हॉस्पिटल ब्रह्मपुरी तर मेघा आकाश बनारसे ही पेशंट आमच्याकडे दिनांक 30 डिसेंबर 2024 ला संध्याकाळी चार वाजता भरती झालेली आहे होती पेशंट आली तेव्हा तिचं कंडिशन खूप क्रिटिकल होती तिला श्वास घ्यायला खूप जास्त त्रास होता तिचा ऑक्सिजन लेवल 36 होता तिचा बीपी 80 बाय 60 असं होतं पेशंट पूर्णपणे शुद्धीवर नव्हती तिला श्वास घ्यायला खूप जास्त त्रास होत होता तिच्या पोटाच्या खालच्या भागातून जो ऑपरेशनचा घाव होता तिथून पस वाहत होता आणि जे टाके होते ते सेप्रेट झालेले होते. अशा कंडिशन मध्ये पेशंटला मी ॲडमिट केलं पेशंटला आयसी मध्य ॲडमिट केला तिला श्वास घ्यायला त्रास होतो म्हणून आम्ही तिला व्हेंटिलेटर वर टाकला बीपी वाढवण्याचे औषध सुरू केले हायर अँटीबायोटिक सुरू केले त्याच्यानंतर तिचं बीपी जेव्हा नॉर्मल झाला तेव्हा तिचा आपण सिटीस्कॅन केला सिटीस्कॅन मध्ये असं दिसलं की तिच्या पोटामध्ये दोन्ही बाजूला राईट आणि लेफ्टला पोस्ट जमा आहे त्याच्या ऑपरेशन करण्याचा प्लॅनिंग केलं जेव्हा तिचा दुस-्या दिवशी बीपी नॉर्मल झाला थोडासा तेव्हा आपण तिचा ऑपरेशन प्लान केला नागपूरचे डॉक्टर अपूर्व सिंग जनरल सर्जन यांनी तो ऑपरेशन केला ऑपरेशन मध्ये जे काही होतं ऑपरेशन तिचा पोट उघडल्यानंतर जे काही पास होतात ते सर्व बाहेर काढून हे सर्व ऑपरेशन करण्यात आलं त्याच्यानंतर आता सध्या पेशंटची कंडिशन क्रिटिकलच आहे तिचं व्हेंटिलेटर अजून निघालेल्या नाहीये. बीपीची औषधी बंद झालेली आहे बीपी तिचा आता सध्या नॉर्मल आहे पण तिचा श्वास घेण्याचा जो त्रास आहे तो अजूनही तसाच आहे तिला खूप वेळ पर्यंत व्हेंटिलेटर लागेल अशी कंडीशन आहे त्याची तिला सर्व हायर अँटीबायोटिक बाकी सर्व सपोर्टिव्ह मेडिसिन सुरू आहेत तिचं टोकियो स्टॉमी केलेला आहे पेशंट डोळे वगैरे उघडत आहे पण पूर्णपणे अजून शुद्धीवर आलेली नाहीये तिला बरेच दिवस अजून हॉस्पिटलमध्ये लागतील असा आमचा अंदाज आहे जनरल ऑपरेटिव्ह सर्जन जे होते आमचे डॉक्टर सिंग सर त्यांना ऑपरेशन दरम्यान तसे लक्षात आलं आहे की डायग्राम उजव्या बाजूला जोस्पॉस झाला होता तो वरती लंग मध्ये कम्युनिकेट झाला होता कारण त्याचं कारण होतं की डायग्राम मध्ये एक वन पॉईंट फाईव्ह सेंटीमीटर चा रेंट होता तर त्याच्यामुळे तू रेंट कशामुळे झाला तो अद्याप लक्षात आलेला नाहीये पेशंटच्या पोटाच्या डाव्या बाजूलाही पोटामध्ये एक छोटासा छिद्र पडलेला होता तो सरांनी क्लोज केलेला आहे त्या साईटचा जो पर्स होता तो पण काढलेला आहे दोन्ही बाजूला ट्रेन टाकलेले आहेत आणि टेन्शन सूज रिंग केलेली आहे पुढे का आता पुढची कंडिशन कशी राहील आता आपण रोजच्या रोज असे च म्हणते अजून आपल्याला सांगता येणार नाही.

-डॉक्टर पंकज लडके



भंडारा जिल्हा मध्ये खूपच दुखत घटना झालेली आहे त्यावरूनच सिद्ध होते की आपला हेल्प हेल्थ सिस्टम कित्ता खराब झालेला आहे आज आपले प्रधानमंत्री आपल्याला म्हणतात की आपण जगात मध्ये पाचव्या क्रमांकावर आहोत पण भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील परिस्थिती काय हेल्थ सिस्टम ची एवढी हालत खराब झालेली आहे की काय सुविधा नाही आज सरांडी येथील ढरउ मध्ये दोन महिन्यापूर्वी एक छोटासा ऑपरेशन करण्याकरिता एक महिलेला भरती केलं गेलं आणि त्या ऑपरेशनच्या दरम्यान तिला इंटेस्टाइनल पर्फोरेशन झालं तीन दिवसात तिला प्रायव्हेट हॉस्पिटल मध्ये भरती करण्यात आला तिथून तिचा डिस्चार्ज झालं घरी गेली पण तिच्या जखमेतून पस वाहत होता असं त्यांचं रिलेटिव्ह मी सांगितलं दररोज ते प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये जात होते पण अजून तिची तब्येत खराब झाली आणि कुठेतरी प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये तिला भरती करण्यात आले ती लढली दीड ते दोन महिन्यात लढले आणि 18 जनवरी 2025 रोजी तिचा निधन झाला . पहिली मागणी ज्यांनी पण ऑपरेशन केला आहे त्यांना सस्पेंड करा. दुसरी मागणी ही होती ती तिचे मुलाबाळा चं काय होणार त्यांना आता कोण पोहचेल गव्हर्नमेंट त्यांना मदत देईल का ? तिसरी मार्ग त्यांची पैशाची मागणी होती त्यासाठी आर्थिक मदत म्हणून सीएस साहेबांनी त्यांना अडीच लाख रुपये उद्याला देईन असं त्यांनी लिखित रूपामध्ये दिलं .

-डॉ.प्रशांत पडोले



पेशेंट का नाम मेघा बनारसे है पेशंट 19 तारीख की रात को हमारे पास एडमिट हुआ था 19 नवंबर को पेशेंट को दो से तीन दिन पहले उनके पीएचसी में उन्होंने एक ऑपरेशन कराए थे गरबा इसका ऑपरेशन के बाद कुछ कॉम्प्लिकेशंस कंडीशन में हमारे पास पेशेंट 19 तारीख को रात को आया था हमने 19 तारीख की सुबह उनका ऑपरेशन किए थे इसमें ढाई लीटर के आसपास निकला था और अटहदी में एक जगह क्षेत्र तो वह रिपेयर किए थे पेशेंट हमारे पास 15 दिन के आसपास एडमिट था 4 दिसंबर को पेशेंट को छुट्टी हुई थी पेशेंट छुट्टी जाने के बाद हमारे पास फिर से विकसित के लिए आया जिसमें पेशेंट को चलकर आया खाना पीना कुछ खा रहा था और बाकी सारी चीज 21800 कुछ बिल बना था जिसमें से 14800 का हमने उनको डिस्काउंट दिए थे पेशेंट ने ओं ग्राउंड 5000 का पेमेंट किया था 2000 उन्होंने ऑफिशल्स ने संपर्क किया था कि क्या आप कैसे हुआ है वह भी हमने ऑपरेशन करने से पहले ही कंफर्म कर दिया था उसे दौरान पेशेंट शायद वापस दोबारा आया था.

हमारे पास बट मैं नहीं होने के कारण मुझे जहां तक जानकारी है वह ब्रह्मपुरी में कहीं एडमिट है और ऑपरेशन नहीं हुआ है क्या है कमजोर था ही जब से आया था इनिशियली सीरियस कंडीशन में ही था कमजोर था उनका प्रोटीन भी बहुत कम था हमने मल्टीप्ल प्रोटीन के इंजेक्शन लगाए थे और किया था हो सकता है उनकी कहानी उसे समय स्त्रियों से थोड़ा बहुत पास में ही रहते हैं तो अतिथियों को इंजरी होने का चांस यह रहता है हर पेशेंट में होगा क्या तो ऐसा जरूरी नहीं है कभी-कभी किसी में हो सकता है की तरफ से नहीं आई है उनका ऑफिशियल लेटर आएगा तो उसका ऑफीशियली जवाब देंगे.

- डॉ.श्रीकांत गिरेपुंजे



मी डॉक्टर रोशनी राऊत वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय लाखांदूर मी 16 तारखेला स्त्री कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया आयोजित केले होते त्यानुसार दहा पेशंट पंधरा तारखेला ॲडमिट झाले आणि 16 तारखेला ते कॅम्प आम्ही आयोजित केला त्यानुसार मी 16 तारखेला सगळे पेशंट तपासले त्यांच्या चाचणी तपासल्या आणि पेशंट फिट असल्यामुळे त्यांना शस्त्र केलेला घेतलं सगळ्या शस्त्रक्रिया समाधान कारक झाल्याआणि समाधानकारक शस्त्रक्रिया आटोपल्या नंतर मी त्यांचा पोस्ट ऑफ राहुल घेतला आणि तिथल्या सिस्टर आणि वैद्यकीय अधिका-्यांना त्यांची काळजी घेण्यास सांगून मी माज्या लाखांदूर ला परत झाले त्यानंतर मला 18 तारखेला दीड वाजता फोन आला की पेशंट एक पेशंट आहे जी तिचं नाव मेगा बनारसे आहे तिला थोडं पोटात दुखतंय उलट्या होतात आणि तिने मोशन पास केले नाही म्हणजे तिला टॉयलेट झाली नाही आहे त्यामुळे तिथल्या डॉक्टरांनी तिला थोडं दिले आहे तर हे मला कळल्यानंतर मी तिला थोड्यावेळ बघायला सांगितलं तिला बेटर होतं का ते बघा म्हटलं आणि समजा बेटर होत नसेल तर करा परंतु त्यानंतर मला काहीच इन्फॉर्मेशन त्यांच्याकडून 18 तारखेला मला दुपारला फोन आला की एक पेशंट आहे मेघा बनारसे आ.काश दुखतंय उलटी होते आणि तिला मोशन पास केले नव्हते त्याचा अर्थ की तिला टॉयलेट झाला नव्हता तर त्यांनी तिथल्या वैद्यकीय अधिका-्यांनी तिला होतं त्यानुसार मी त्यांना सांगितले की तुम्ही थोडा वेळ करा आणि कमी जास्त वाटल्यास तिला आपण हायर सेंटरला गव्हर्मेंट हॉस्पिटलला रेफर करू मला असं वाटले की ते गव्हर्मेंट हॉस्पिटलला रेफर झाली असेल किंवा बरी झाली असेल परंतु जेव्हा चौकशी समिती स्थापन झाली तेव्हा मला तिची परिस्थितीच्या परिस्थितीबद्दल माहीत झाले आणि आता ती व्हेंटिलेटर वर आहे असे कळले समितीमध्ये मला कळले की तीची तब्येत फारच खालावलेली आहे आणि आता तिच्यासोबत काय घडले हे मला माज्याकडून ऑपरेट झाली होती त्याच्यामुळे आता मला असं वाटते की ती लवकरात लवकर बरी व्हावी अशी माझी इच्छा आहे आणि मी अशी प्रार्थना करते.

- डॉ.रोशनी राऊत

# सुगंधित तम्बाकू जब्त, 2 बंदी

## तंबाकू व 2 वाहन सहित 12.54 लाख का माल जब्त

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**

**भंडारा** : जिले में आतंकवाद निरोधक दस्ते ने एक बड़ी कार्रवाई करते हुए प्रतिबंधित सुगंधित तम्बाकू ले जा रहे दो वाहनों को पकड़ा. इस कार्रवाई में 12 लाख 54 हजार 480 रुपये का माल जब्त कर 2 आरोपियों को हिरासत में लिया गया है.

दूध के कंटेनर में रखा था तंबाकू

पुलिस अधीक्षक नुरुल हसन को गोपनीय सूचना मिली थी कि एक दूध कंटेनर में प्रतिबंधित सुगंधित तम्बाकू राजनांदगांव से लाखनी लाई जा रही है. उन्होंने आतंकवाद निरोधक दस्ते को तत्काल कार्रवाई करने का आदेश दिया. शुक्रवार दोपहर करीब 1 बजे एक टीम ने लाखनी थाना क्षेत्र के अंतर्गत राजेगांव एमआईडीसी क्षेत्र में जाल बिछाया. सिद्धि इंडस्ट्रयल गैस प्रोडक्ट्स कंपनी के सामने सड़क पर हल्दीराम कंपनी



का दूध टेम्पो (क्र. एमएच-40-एके-5640) और एक सफेद मारुति ओमनी वैन (क्र. एमएच 40-बीई-0668) खड़ी पाई गईं.

इस समय दोनों वाहनों में फ्लेवर्ड तंबाकू लोड करने की प्रक्रिया चल रही थी, तभी टीम ने दोनों वाहनों पर छापा मारा और माल जब्त कर लिया. पुलिस ने होला हुक्का शीशा तंबाकू 1,64,000 रुपये के 200 पैकेट, ईगल जेन तंबाकू 84,480 रुपये के 132 पैकेट, माजा 108 कंपनी फ्लेवर्ड तंबाकू कीमत 47,000 रुपये के 200 डिब्बे, हल्दीराम कंपनी का टाटा टेम्पो, और मारुति ओमनी वैन, दो मोबाइल सहित कुल 12 लाख रु. का माल जब्त किया गया.

**आरोपी हिरासत में, मुख्य मालिक फरार**

इस कार्रवाई में टाटा टेम्पो चालक प्रशांत कृष्णराव खड़से (नागपुर निवासी) और मारुति ओमनी वैन चालक मुन्नेश्वर जानबा हरिकर (पवनी, भंडारा निवासी) को गिरफ्तार किया गया है. हालांकि मुख्य मालिक अशफाक पठान दोपहिया वाहन पर सवार होकर घटनास्थल से फरार हो गया. इस मामले में लाखनी पुलिस स्टेशन में मामला दर्ज कर लिया गया है और फरार आरोपियों की तलाश जारी है. यह अभियान पुलिस अधीक्षक नुरुल हसन और अतिरिक्त पुलिस अधीक्षक ईश्वर कातकड़े के मार्गदर्शन में चलाया गया. आतंकवाद निरोधक शाखा के भंडारा दस्ते ने सपुनि नागलोत. हवालदार गभने, हवालदार वैदय, हवालदार तांडेकर, पुलिस कर्मचारी दमाहे और भूते के सहयोग से किया.


# अवैध रेत परिवहन के खिलाफ पुलिस की कार्रवाई

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**

**भंडारा** : जिले में अवैध रेत परिवहन के खिलाफ कारधा पुलिस ने बड़ी कार्रवाई करते हुए 3 ट्रक और रेत समेत कुल 1 करोड़ 31 लाख 80 हजार रुपये का माल जब्त किया है. इस मामले में दो आरोपियों को गिरफ्तार किया गया है, जबकि अन्य आरोपियों की तलाश जारी है. कारधा पुलिस थाने के अधिकारियों और कर्मचारियों ने गुप्त सूचना के आधार पर शनिवार तड़के 3:40 बजे से 4:40 बजे के बीच राष्ट्रीय राजमार्ग 53 पर कारधा चौक और साकोली टोल नाके पर जाल बिछाया. लाखनी से भंडारा की ओर आ रहे ट्रकों की जांच के दौरान टल्र 37 ह 7776, टल्र 30 इऊ7029 और ठछ 01 अट 4862 नंबर के ट्रक अवैध रेत परिवहन करते हुए पाए गए. ट्रक चालकों ने स्वीकार किया कि वे मालिकों के निर्देश पर छत्तीसगढ़ से अवैध रेत परिवहन कर रहे थे. हालांकि, एक ट्रक का चालक अंधेरे का फायदा उठाकर मौके से फरार हो गया. गिरफ्तार आरोपी नाम म्हसनी, तहसील मानोरा, जिला वाशिम निवासी संतोष भारत चव्हाण (32), सतरंजीपुरा, बालापुर, जिला अकोला निवासी शेख अकबर शेख अजगर (30), फरार आरोपी के नाम कारंजा/लाड, जिला वाशिम निवासी मुकेश सचानंद थड्डानी (42), हिंगना रोड, अकोला निवासी निलेश अनवाडे (40), गणराजनगर, बाफना रोड, नांदेड निवासी परविंदर सिंह जगतार सिंह ढिल्लों है. इस कार्रवाई में कुल 1 करोड़ 31 लाख 80 हजार रुपये का सामान जब्त किया गया.

## संपादकीय

# इस्त्रोच्या अद्वितीय कामगिरीचे कौतुक



भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्त्रोने गुरुवारी आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. पृथ्वीपासून तब्बल ४७५ किलोमीटर उंचीवर अंतराळात दोन भारतीय उपग्रह एकमेकांना जोडण्यात (डॉक) इस्त्रोला यश मिळाले. दोन उपग्रहांचे अंतराळात यशस्वीरित्या डॉकिंग करणारा भारत हा रशिया, अमेरिका आणि चीननंतर चौथा देश बनला आहे. इस्त्रोची ही कामगिरी अभूतपूर्व असून या कामगिरीची इतिहासात सुवर्ण अक्षराने नोंद होणार आहे. केवळ भारतच नाही, तर जगभरातील अंतराळ संशोधन क्षेत्रातून इस्त्रोच्या या अद्वितीय कामगिरीचे कौतुक केले जात आहे. अंतराळात भारताचे स्पेस स्टेशन स्थापन करणे आणि चांद्रयान-४ यासारख्या मानवी अंतराळ मोहिमांसाठी डॉकिंग तंत्रज्ञानावर प्रभुत्व मिळवणे ही पहिली पायरी म्हणता येईल. ही पायरी इस्त्रोने अनेक खडतर आव्हानांवर मात करत गाठली आहे. इस्त्रोने गेल्या वर्षी स्पेस डॉकिंग प्रयोगाला सुरूवात केली होती. या मोहिमेला स्पेडेक्स असे नाव देण्यात आले होते. या मोहिमेंतर्गत ३० डिसेंबर २०२४ रोजी इस्त्रोने श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून पीएसएलव्ही-सी ६० रॉकेटचा वापर करून २२० किलो वजनाचे चेसर आणि लक्ष्य असे दोन उपग्रह अंतराळात प्रक्षेपित केले होते.

२ जानेवारीला इस्त्रोने डॉकिंग चाचणीदरम्यान, दोन्ही उपग्रहांना ३ मीटरपेक्षा कमी अंतरावर आणले होते. मधल्या काही दिवसांमध्ये दोन्ही उपग्रहातील अंतर कमी-जास्त ठेवण्यात इस्त्रोला अपयश येत होते, त्यामुळे सातत्याने डॉकिंगची प्रक्रिया पुढे ढकलण्यात येत होती. अखेर गुरुवारी सकाळी दोन्ही उपग्रहांना एकमेकांशी जोडण्यात अर्थात डॉकिंग करण्यात इस्त्रोला यश आले. इस्त्रोच्या या मोहिमेचा उद्देश अंतराळात डॉकिंग-अनडॉकिंग तंत्रज्ञानाचे यशस्वीपणे प्रात्यक्षिक करणे हा आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, एका विशिष्ट तंत्रज्ञानाद्वारे दोन्ही उपग्रह अंतराळात एकमेकांशी जोडणे याला डॉकिंग तर दोन्ही उपग्रह अंतराळात विलग करणे याला अनडॉकिंग म्हणतात. पृथ्वीवरील कमांड सेंटरमध्ये बसून अंतराळात कित्येक किमी उंचीवर स्थापित उपग्रहांची एकमेकांशी टक्कर होऊ न देता उपग्रहाचे वेगवेगळे भाग एकमेकांच्या दिशेने आणणे आणि त्यांना अलगदरित्या जोडणे ही प्रक्रिया अत्यंत जटील आणि किचकट असते.

हे तंत्रज्ञान सर्वात पहिल्यांदा विकसित करून अमेरिकेने १९६६ रोजी स्पेस डॉकिंग केले होते. त्यानंतर वर्षभरातच १९६७ साली सोव्हियत रशियाने स्पेस डॉकिंग करून दाखवले होते. पुढच्या काळात अंतराळात स्पेस स्टेशन बनवून या दोन्ही देशांनी अंतराळात अनेकदा मानवी मोहिमा केल्या. पुढे अंतराळवीरांचा सहभाग असलेल्या चांद्रमोहिमांनी मानवजातीचे चंद्राबाबतचे कुतूहल शमवण्यात मोठी भूमिका बजावली. २००० सालात नवीन आर्थिक शक्ती म्हणून उदयास आलेल्या चीननेही २०११ मध्ये स्पेस डॉकिंग तंत्रज्ञान मिळवले. यापैकी एकाही देशाने हे तंत्रज्ञान एकमेकांशी शेअर केलेले नव्हते. त्या तुलनेत भारताला हा टप्पा गाठण्यासाठी बरीच वर्षे प्रतीक्षा करावी लागली.हे जरी खरे असले, तरी हे तंत्रज्ञान भारताने प्रयोग करत करत स्वतःच विकसित केलेले आहे,

हे विशेष. २०४७ पर्यंत चंद्रावर मानव पाठवण्याचे भारताचे लक्ष्य आहे. त्याआधी अंतराळात स्पेस स्टेशन उभारणे हा महत्त्वाचा टप्पा आहे. स्पेस स्टेशन उभारण्यात भारत यशस्वी ठरल्यास अंतराळवीरांना अंतराळात पाठवणे, यानांची दुरुस्ती करणे, यानांमध्ये इंधन भरणे आदींसाठी भारताला इतर देशांच्या स्पेस स्टेशनवर अवलंबून राहावे लागणार नाही. पृथ्वी आणि चंद्रामधील हे डेस्टिनेशन भविष्यातील भारताच्या अंतराळ मोहिमांना व्यापक रूप देणारे ठरेल. आजघडीला अंतराळ संशोधन क्षेत्रात भारत एक मोठी शक्ती म्हणून नावारूपाला आलेला देश आहे. यामध्ये अर्थातच इस्त्रोचे बहुमूल्य योगदान आहे. अमेरिका, युरोपियन देशातील शेकडो उपग्रह इस्त्रोने आतापर्यंत यशस्वीरित्या प्रक्षेपित केले आहे. जागतिक उपग्रह प्रक्षेपण बाजारात अत्यंत कमी खर्चात उपग्रह अंतराळ पाठविणारा भारत एक सशक्त आणि तितकाच विश्वासाचा पर्याय निर्माण झालेला आहे.

उपग्रह प्रक्षेपणाच्या जागतिक ६ अब्ज डॉलरच्या बाजारपेठेत हळूहळू इस्त्रोची हिस्सेदारी वाढू लागली आहे. इस्त्रो आज भारताचा अभिमान आहे. १९६२ मध्ये स्थापन झालेल्या इस्त्रोचे नाव पूर्वी इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रिसर्च असे होते. ज्येष्ठ शास्त्रज्ञ विक्रम साराभाई हे या संस्थेचे प्रमुख होते. साराभाईंकडे मोजक्याच शास्त्रज्ञांची टीम होती. शिवाय पैशांचीही कमतरता होती.

अत्यंत गरीब आणि एक वेळच्या अन्नासाठीही संघर्ष करावा लागणा या भारतीय जनतेला कशाला हवे रॉकेट सायन्स अशी त्यावेळची सर्वसामान्यांची धारणा होती. पण सा- राभाईंनी वर्षभरातच मोठ्या चिकाटीने पहिले रॉकेट प्रक्षेपित करून भविष्यातील अंतराळ मोहिमांचा राजमार्ग दाखवून दिला होता. ५ दशकांनंतर आपण चंद्र, मंगळ आणि त्यापलीकडे सूर्याच्या दिशेने अंतराळयान पाठवत आहोत. तेही युरोप, अमेरिका, रशिया, चीनपेक्षाही अत्यंत कमी खर्चात आणि स्वदेशी तंत्रज्ञान वापरून. हे इस्त्रोच्या शास्त्रज्ञांच्या कठोर परिश्रमाचे फळ आहे. याचा पुढचा टप्पा असणारे स्पेस स्टेशन भारताचा अंतराळातील अधिकृत पत्ता असेल.

# धरणाच्या साठवणूक पाण्यात वाढ; मदतीसाठी बपेऱ्यातील बळीराजाचा टाहो

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



**चुल्हाड (सिहोरा) :** वैनगंगा नदीवरील कवलेवाडा धरणात पाण्याच्या साठवणूक क्षमतेत वाढ करण्यात आल्याने बपेरा गावातील शेतकऱ्यावर नवे संकट ओढवले आहेत. बागायती शेत बुडाले आहेत. धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा २ अंतर्गत सर्वेक्षण करण्यात आले असले, तरी बुडीत शेतीची आर्थिक मदत मिळाली नसल्याची माहिती नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी दिली आहे.

धापेवाडा उपसा सिंचन प्रकल्प आणि अदानी वीज प्रकल्पाला पाणीपुरवठा करण्यासाठी सिहोरा परिसरातून गेलेल्या वैनगंगा नदीवरील कवलेवाडा गावाचे शेजारी धरणाचे बांधकाम करण्यात आले आहे. धापेवाडा उपसा सिंचन प्रकल्प १ आणि २ ला पाणीपुरवठा करण्यासाठी धरणात पाणी अडविण्यात येत आहे. धरणात पाणी अडविण्यात येणार असल्याने सिंचन प्रकल्पाने शेतकऱ्यांचे नद्यांचे काठालगत शेतशिवार करारबद्ध केले आहे.

**मात्र सूचना दिली नाही**

गावातील १२ शेतकऱ्यांनी मालकीच्या शेतात भाजीपाला उत्पादन घेण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, कवलेवाडा धरणात पाण्याचे साठवणूक क्षमतेत वाढ करण्यास सुरुवात करण्यात आली पण सूचना देण्यात आली नाही.

**शेतशिवारात पाणी**

वैनगंगा नदीचे पात्र तुडुंब भरले आहे. धरणाचे संपूर्ण दरवाजे बंद करण्यात आले आहेत. नदीचे पात्र तुडुंब भरल्याने बपेरा गावाच्या शेतशिवारात शिरल्याने भाजीपाला उत्पादनाचे पीक अक्षरशः बुडाले आहे.

**१२ भाजीपाला पिकांचे प्रचंड नुकसान**

शेतकऱ्यांचे बागायत शेत बुडाले आहेत. गतवर्षीही अशीच अवस्था या शेतकऱ्यांची झाली होती. मात्र मदतीच्या अपेक्षेत असतानाही त्यांना न्याय मिळालेला नाही.

**हे आहेत बुडीत शेतीचे शेतकरी**

फटका बसलेल्या शेतकऱ्यांमध्ये हिरालाल उपरीकार, वासुदेव उपरीकार, महादेव उपरीकार, तिलकचंद राऊत, शोभाराम राऊत, गुहू आंबेकर, सुरेश जताळे, पुरुषोत्तम उपरीकार, दिलीप मुळे, अजय खंगार, विक्रम बोरघरे, नंदलाल बोरघरे यांचा समावेश आहे. पिकांची नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी धापेवाडा उपसा सिंचन प्रकल्प २ ची असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली आहे.

धरणात पाण्याच्या साठवणूक क्षमतेत वाढ करण्यात आल्याने बपेरा गावाच्या शेतशिवारात घेण्यात येणारे भाजीपाला उत्पादनाचे पीक बुडाले असून सडले आहेत. शेतशिवार धापेवाडा उपसा सिंचन प्रकल्प २ सोबत करारबद्ध नाही. यामुळे नुकसाभरपाईची मागणी करण्यात आली आहे.

**- हिरालाल उपरीकार, शेतकरी, बपेरा.**

# महाराष्ट्रातून धान्य न्या, छत्तीसगडमधून रेती आणा !

## रेती तस्करांचा नवा प्रकार



**आवाज भंडारा / प्रतिनिधी**

**मोहाडी :** महाराष्ट्रातून छत्तीसगड राज्यात ट्रेलरमधून धान्य न्यायचे, आणि त्या रिकाम्या ट्रेलरमधून चोरीची रेती महाराष्ट्राच्या सीमेत आणून विल्हेवाट लावण्याचा प्रकार भंडारा पोलिसांच्या नाकाबंदीत उघड झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी ट्रेलरसह १० ब्रास रेती जप्त करून चालकाला अटक केली आहे. यातून रेती तस्करीची आंतरराज्यीय साखळी पोलिसांच्या हाती लागण्याची शक्यता आहे.

सेंदूरवाफा येथील नाकाबंदी चौकीवर मंगळवारच्या रात्री उशिरा पोलिसांना हा प्रकार लक्षात आला. नाकाबंदीदरम्यान, वाहनांची तपासणी करीत असताना एनएल ०१ / एजे २०२२ क्रमांकाच्या ट्रेलरमधून रेतीची वाहतूक होत असल्याचे लक्षात आले. ट्रेलरमधून रेतीची वाहतूक करणे अपेक्षित नसल्याने पोलिसांनी अधिक चौकशी केली असता, या ट्रेलरमधून छत्तीसगड राज्यात धान्य, भाजीपाला अशा जीवनावश्यक वस्तू नेल्या जायच्या.

परत येताना त्या रिकाम्या ट्रेलरमध्ये छत्तीसगड राज्यातून रेती भरून भंडारामार्गे नागपूरकडे नेली जायची, असा प्रकार पुढे आला. या संदर्भात अटक केलेल्या वाहनचालकाने, या पद्धतीने रेती चोरून नेण्याची ही तिसरी फेरी असल्याचे सांगितले. सत्येंद्रकुमार बिरेंद्रसिंग सिह (४१, गाडीगुडा, छत्तीसगड) याला अटक करून पोलिस कोठडीत ठेवण्यात आले आहे.

# नेरला उपसा सिंचन योजनेचे रखडलेले काम केव्हा सुरु करणार ?

## १५ दिवसांच्या आत सुरु न झाल्यास उपोषण

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



**किटाडी :** गोसेखुर्द पाटबंधारे विभागाच्या वतीने नेरला उपसा सिंचन योजना विभाग आंबाडी अंतर्गत जलसाठ्याच्या आधारावर कोरडवाहू क्षेत्रात उन्हाळी धान पिकासाठी सिंचनाची सुविधा करण्यात आली. मात्र, लाखनी तालुक्यातील किटाडी क्षेत्रात शिवारातील शेतकऱ्यांना अद्यापही कोणतीही सिंचनाची सुविधा उपलब्ध केली गेली नाही.

परिणामी, कोरडवाहू क्षेत्रातील शेतकरी सिंचन सुविधांपासून वंचित आहेत. याबाबत किटाडी येथील किसान सहकारी पाणीवापर संस्था व शेतकऱ्यांच्या वतीने पाइपलाइनचे रखडलेले काम पूर्ण करण्याची एकमुखी मागणी संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आलेली आहे. किटाडी शिवारातून गावालगतच्या बाजूने २०२१ मध्ये भूमिगत नहर पाइपलाइन गेलेली आहे. मात्र, आता तीन वर्षांचा कालावधी लोटूनही ती पाइपलाइन अद्यापपर्यंत अपूर्ण अवस्थेत असून, काम रखडलेले आहे.

नेरला उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून किटाडी व परिसरातील अंदाजे जवळपास एक हजार हेक्टर क्षेत्रावर सिंचन होणे अपेक्षित आहे. धरणाचे पाणी शेतीला मिळण्यासाठी शेतकरी आतुर आहेत. पाइपलाइनची कामे पूर्णत्वास गेल्यास शेतकऱ्यांचे हरितक्रांतीचे स्वप्न निश्चितच पूर्ण होईल.

**उपोषणाचा इशारा**

रखडलेले भूमिगत पाइपलाइनचे काम पूर्ण करण्याच्या अनुषंगाने यापूर्वी किटाडी येथील पदाधिकाऱ्यांनी संबंधित विभागाला पत्राद्वारे कळविले आहे. शेतकऱ्यांना पुढे उन्हाळी धान पिकाचे उत्पादन घेणे सोयीचे होईल, कामाला १५ दिवसांत सुरुवात करावी, अन्यथा उपोषण करण्याचा इशारा संस्थेचे अध्यक्ष ईश्वर चौधरी, सुकराम भोयर, सचिव लेकराम चौधरी यांनी दिला आहे.

रखडलेले काम कंत्राटदाराने पूर्ण न केल्यामुळे संबंधित कंत्राटदारावर दंड आकारण्यात आला आहे. या कामाला गती मिळण्याच्या अनुषंगाने पुढील आठवड्यात वरिष्ठ स्तरावर आढावा बैठक घेण्यात येईल.

**- एस. आर. भुरे, उपविभागीय अभियंता,**

# राजेदहेगाव गोवरी नदीतून बैलगाडीद्वारे रेतीतस्करी जोमात

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**

**जवाहरनगर :** सध्या जिल्हाभरात मोठ्या प्रमाणात रेतीतस्करीत वाढ झाली आहे. नवनवीन शक्कलचे वापर करून रेतीतस्करी केली जात आहे. मागील काही दिवसांपूर्वी नागपूर विभागीय पोलीस आयुक्त यांनी विभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांचे ४ चमू तयार करून जिल्ह्यातील रेती तस्करीत वापर केल्या जात असलेले रेतीसह ९ ट्रॅक्टर पकडले.

# फूलमोगरा नाल्यात प्रेत आढळले

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**

**जवाहरनगर :** पोलीस स्टेशन हद्दीत तालुक्यातील भंडारा फूलमोगरा नाल्यात दि. २० जानेवारी दुपारी ३ वाजता दरम्यान पाण्यावर एकाचे प्रेत तरंगताना दिसून आले. यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. मृतक हा भंडारा येथील जमनालाल बजाज वाडार्तील नारायण किसन माकडे (६४) या व्यक्तीचे असल्याचे सांगितले जात आहे. भंडारा तालुक्यातील फूलमोगरा गावाजवळील नाल्यातील पाण्यावर एका अज्ञात व्यक्तीचे प्रेत तरंगताना दिसून आले. याची माहिती गावात व परिसरात घटनास्थळी होताच नागरिकांनी धाव घेतली. माहिती मिळताच जवाहरनगरचे पोहवा महेश कडव व पोना संदीप बंबावले यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. प्रेत पाण्याबाहेर काढून प्रेताची ओळख केली. सदरप्रेत नारायण माकडे या व्यक्तीचे असल्याचे निष्पन्न झाले. घटनेचा पंचनामा करून प्रेत शवविच्छेदनाकरिता पाठविण्यात आले. पुढील तपास जवाहरनगर पोलीस करीत आहेत.

# तुमसर शहरातील 156 कोटीच्या भुमीगत गटार योजनेचे भिजत घोंगडे

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**

**तुमसर :** शहराच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी भूमिगत गटार योजना सध्या लालफितीत अडकली असून सदर प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी शासनस्तरावर धूळखात पडला आहे. परिणामी भूमीगत गटार योजनेचे भिजत घोंगडे आहे.

सांडपाणी प्रक्रिया करून ते नदीपात्रात सोडण्यासाठी नॅशनल ग्रीन ट्रिब्युनलने निर्देश दिले असले तरी या योजनेच्या तांत्रिक मान्यता आणि प्रशासकीय प्रक्रियांकडे होणारे दुर्लक्ष नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. या रखडलेल्या योजनेमुळे शहराच्या

आरोग्य आणि स्वच्छतेसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या प्रकल्पाचे भवितव्य अनिश्चित बनले आहे. १५६ कोटींचा प्रस्ताव पण ठप्प प्रगती नगर पालिकेचे तत्कालीन मुख्याधिकारी सिद्धार्थ मेश्राम यांनी १५६ कोटी रुपयांचा भूमिगत गटार योजनेचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठवला होता. मात्र या प्रस्तावाबाबत कोणतीही ठोस प्रगती झालेली नाही विद्यमान मुख्याधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी याकडे गांभीयार्ने लक्ष देणे अपेक्षित होते. पण प्रशासनाच्या उदासीनतेमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. तीन झोनमध्ये विभागणीचा प्रस्ताव परंतू संथ कार्यवाही योजनेंतर्गत शहराला तीन झोनमध्ये विभागले असून प्रत्येक झोनमधून सांडपाणी प्रक्रिया केंद्राकडे वळवले जाणार आहे. परंतू या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेला लागणारा वेळ आणि संथ कार्यवाहीमुळे प्रकल्पाच्या अंमलबजावणीत प्रचंड विलंब होत आहे. नागरिकांमध्ये वाढता रोष शहराच्या आरोग्य आणि पर्यावरण रक्षणासाठी भूमिगत गटार योजना अत्यंत गरजेची असूनही तिच्याकडे होणारे दुर्लक्ष नागरिकांच्या आरोग्यासाठी घातक ठरत आहे. सांडपाणी थेट नदीपात्रात सोडले जात असल्याने पर्यावरणाला हानी पोहोचत असून आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांमध्ये रोष वाढत चालला आहे. शासनाकडे तातडीने निर्णय घेण्याची मागणी या महत्त्वाकांक्षी योजनेची त्वरित अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी नागरिक करत आहेत. लोकप्रतिनिधींनीही प्रकल्पाच्या प्रगतीसाठी ठोस प्रयत्न करावेत आणि योजना लवकर पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा. अन्यथा योजनेच्या विलंबामुळे शहराच्या विकासाला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. तुमसरच्या प्रगतीसाठी योजना अत्यावश्यक भूमिगत गटार योजना ही तुमसरच्या भविष्याच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. या योजनेला प्राधान्य देऊन प्रशासनाने ती मार्गी लावल्यास शहराचे आरोग्य आणि पर्यावरण संरक्षित होईल.

# २०२५ मध्ये शिक्षकांना ७६ सुट्ट्या मात्र प्रत्यक्षात मिळणार ९२ सुट्ट्यांची पर्वणी

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



**मोहाडी :** शिक्षक कर्मचाऱ्यांना किती सुट्टधा मिळतील याबाबतची उत्सुकता लागली होती. विद्यार्थ्यांपासून तर शिक्षक कर्मचाऱ्यांचे लक्ष सुट्टधांच्या यादीकडे लागून राहिले होते. आता ती प्रतीक्षा संपली आहे. शिक्षक कर्मचाऱ्यांना २०२५-२०२६ या वषार्तील रेकार्डवर ७६ सुट्टया आहेत. प्रत्यक्षात मात्र ९२ सुट्टयांची पर्वणीच प्राप्त झाली आहे.

नवीन वर्ष सुरू झाले. नवीन शैक्षणिक वषार्तील सुट्टयांची प्रतीक्षा शिक्षक कर्मचाऱ्यांना लागली होती. नवीन वषार्तील सुट्टयांबाबत मुख्याध्यापक संघटना, शिक्षक संघटना व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेची संयुक्त बैठक शिक्षणाधिकारी (माध्यमिक) रवींद्र सलामे यांच्या कक्षात शुक्रवारी घेण्यात आली. सर्व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सविस्तर चर्चा करून २०२५ या वषार्तील सुट्टया ठरविण्यात आल्या आहेत.

उन्हाळ्याच्या सुट्टया १७ मे ते २५ जूनपर्यंत राहणार आहेत. २६ जूनला नवीन शैक्षणिक वषार्ची सुरुवात होणार आहे. नियोजित सुट्टयाच्या व्यतिरिक्त रविवार व सुट्टयांचे दिवस सोडण्यात आले आहेत. उन्हाळ्यात ७ सुट्टया अधिक मिळणार आहेत. दिवाळीच्या सुट्टया १६ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबरपर्यंत राहणार आहेत. १ नोव्हेंबरपासून शाळा सुरू होणार आहे. दिवाळीच्या सुट्टा रविवार व अन्य सुट्टया वगळून ५ सुट्टया अधिक मिळणार आहेत. कर्मचारी संघटनेच्या संयुक्त बैठकीत झालेल्या या निर्णयाची माहितीही शिक्षण वतुर्ळात चचेर्चा विषय ठरली आहे.

सार्वजनिक सुट्टया २४ आहेत; परंतु प्रजासत्ताक दिन, गुढीपाडवा, रामनवमी, मोहर्रम, गणेश चतुर्थी हे सण रविवारी येत आहेत. नियोजित सार्वजनिक सुट्टया २० ठरविण्यात आल्या आहेत. माध्यमिक, उच्च माध्यमिक, नगर परिषद, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा ७६ सुट्टया ठरवून दिल्या आहेत. रविवार व अन्य सण वगळून शिक्षक कर्मचाऱ्यांना एकूण ९२ सुट्टया मिळणार आहेत. १६ सुट्टयांच्या मेजवानीचा आस्वाद घेता येणार आहे.

**२३० असावे शाळेच्या कामकाजाचे दिवस**

मंजूर करण्यात आलेल्या सुट्टयांचे पालन प्रत्येक शाळांना करायची आहे. शाळेचे कामकाज किमान २३० दिवस राहील याची दक्षता मुख्याध्यापकांना घ्यावी लागणार आहे, हे येथे महत्वाचे.

**३ मार्चपासून होणार सकाळपाळीत शाळा**

फेब्रुवारी व मार्च महिन्यात दहावी-बारावीच्या शिक्षण मंडळाची परीक्षा होणार आहे. मार्च महिन्यात उन्हाचा तडाखा असतो, तसेच शिक्षकांना परीक्षा केंद्रावर पर्यवेक्षण करायला जावे लागते. यामुळे ३ मार्चपासून सकाळपाळीत शाळा भरणार आहे.

# तुमसर तालुक्यातील आदिवासीबहुल गावांसाठी बसगाड्यांची प्रतीक्षा !

आवाज भंडारा / प्रतिनिधी

**तुमसर :** 'प्रवाशांच्या सेवेसाठी' असे ब्रीदवाक्य एसटी महामंडळाचे आहे. परंतु, तुमसर येथे मुख्य मार्गावर नियमित व वेळेवर बसगाड्या सोडण्यात येतात. परंतु, आदिवासीबहुल गावाकडे जाणाऱ्या प्रवाशांना बसगाडीची प्रतीक्षा करावी लागते. रविवारी लेंडेझरीकडे जाणारी बसगाडी सुमारे एक तास उशिरा सोडण्यात आली. तुमसर बसस्थानकात यावेळी प्रचंड गर्दी झाली होती.

मागील दिवाळीपासून हे खोदकाम तसेच आहे. कासवगतीने सुरू असलेल्या कामांचा फटका प्रवाशांना बसत आहे. या आगारातून शहराकडे बसगाड्या सोडण्याचे प्रमाण अधिक आहे. रविवारी या बसस्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी होते. आदिवासी परिसरात जाणाऱ्या लेंडेझरी मार्गावरील मोठ्या प्रमाणात प्रवासी बसस्थानकात बसगाडीची प्रतीक्षा करीत होते. दुपारी एक वाजता ही बसगाडी सुटायला पाहिजे होती, ती एक तास उशिरा म्हणजे दुपारी दोन वाजता सोडण्यात आली.

विकासकामे संथगतीने



तुमसर बसस्थानकात दर्शनी भागात खोदकाम करून ठेवण्यात आलेले आहे. येथे विकासकामे सुरू आहेत. दिवाळीपूर्वी हे खोदकाम करून ठेवण्यात आले होते. परंतु, अजूनपर्यंत ते पूर्ण झाले नाही. मोठ्या संख्येने प्रवासी हे लहानशा जागेमध्ये बसगाड्यांची प्रतीक्षा करीत असतात. विकासकामे का रखडली अथवा कामे संथगतीने येथे का सुरू आहेत.

करण्यात येतो दुजाभाव !

शहराकडे धावणाऱ्या नियमित बसगाड्या येथे सोडण्यात येतात. परंतु, आदिवासीबहुल गावाकडे मात्र उशिरा बसगाड्या सोडण्यात येतात. शहर व ग्रामीण असा दुजाभाव येथे करण्यात येतो, असा आरोप माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक उईके यांनी लावला आहे. प्रवासी मुख्य मार्गावर उतरून जंगल मार्गाने गावाकडे प्रस्थान करतात. वन्यप्राण्यांच्या धोका येथे अधिक असल्याने बसगाड्या वेळेवर सोडण्याची गरज आहे.

मार्गांवर पर्याप्त बस सोडण्याची मागणी

तुमसर तालुक्यातील लेंडेझरी परिसर आदिवासी बहूल आहे. जंगलव्याप्त भागात तुमसर आगारातून सुटणाऱ्या बसेसचे प्रमाणात अत्यल्प आहे. प्रवासी व शाळकरी विद्यार्थ्यांची होतेय गैरसोय.

रविवारी ही बस सुमारे एक तास उशिरा सोडण्यात आली. उलट शहराकडे वेळेत बसगाड्या सोडण्यात येत होत्या. स्थानिक एसटीच्या अधिकाऱ्यांना याबाबत सांगितल्यानंतर दुपारी एक तास म्हणजेच दोन वाजता लेंडेझरी ही बस सोडण्यात आली. त्याचा फटका मलासुद्धा बसला.

**- अशोक उईके,**
**माजी जिल्हा परिषद सदस्य, तुमसर**

# देव्हाडीच्या रेल्वे फाटकावरून तरुणीला सिनेस्टाइल नेले पळवून

आवाज भंडारा / प्रतिनिधी

**तुमसर :** टेलरकडून कापड घेऊन मैत्रिणीसोबत स्कूटीने घरी परतणा-या एका २५ वर्षीय युवतीचे देव्हाडी येथील रेल्वे फाटकावरून तीन युवकांनी सिनेस्टाइल अपहरण केले. ही खळबळजनक घटना बुधवारी सकाळी ११:३० च्या सुमारास घडली. या घटनेमुळे खळबळ उडाली असून आरोपींच्या शोधासाठी पोलिसांनी जिल्हाभर नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली. मात्र, शोध लागला नाही.

देव्हाडी येथील गांधी वॉर्डात राहणा-्या संबंधित तरुणीच्या पालकांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, ही अपहृत तरुणी तिच्या मैत्रिणीसोबत स्कूटीने देव्हाडी येथील टेलरकडे शिवलेले कापड आणण्याकरिता गेली होती. कापड घेऊन घरी परत येताना रेल्वे फाटकावर थांबली. दरम्यान, प्रशांतचंद राजपूत ऊर्फ मकालू (२५, गांधी वॉर्ड देव्हाडी) व त्याच्या दोन अनोळखी साथीदारांनी तरुणीला



बळजबरीने उचलून चारचाकी वाहनात कोंबले आणि पलायन केले. पोलिसांनी या तक्रारीवरून तातडीने तपासाची चक्रे फिरविली. जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या सूचनेवरून वायरलेसवरून सर्वत्र माहिती देऊन जिल्ह्यातील सर्व महामार्गावर नाकाबंदी करून वाहनांची तपासणी करण्यात आली. सायंकाळपर्यंत ती नकाबंदी सुरू होती. मात्र, तपास लागला नाही. दरम्यान, जिल्हा पोलिस उपअधीक्षक ईश्वर कातकडे व इतर वरिष्ठ अधिका□यांनी देव्हाडी येथे भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली. याप्रकरणी तुमसर पोलिसांत भारतीय न्याय संहिता कलम ८७, ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भंडारा-गडचिरोली समृध्दी महामार्गाला शेतकऱ्यांचा विरोध

आवाज भंडारा / प्रतिनिधी

**मासळ :** भंडारा-गडचिरोली समृद्धी महामार्ग शेतकऱ्यांची कुठलीही विचारपूस न करता व शेतकऱ्याला विश्वासात न घेता शासनाने शेतकऱ्यांना शेतजमीन मोजणीचे नोटीस पाठवलं होते. त्यानुसार शेतकऱ्यांनी आपल्या बांधावर हजर राहून मोजणी सहकार्य करावे नाही तर शेतकऱ्यांनी पुनर्मोजणी ही स्वखर्चाने करावी लागेल असे बजाविले असता त्यानुसार महसुलीचे मोजणी अधिकारी मोजणी करीता आज दि. २० जानेवारी २०२५ रोजी शेतकऱ्यांच्या शेतात येताच शेतकऱ्यांनी विरोध दर्शवित आणि घोषणाबाजी करत शेतकऱ्यांचा एक ग्रुप करांडला- राजनी व दूसरा गट सरांडी/बू-घरतोडा रोडवर बसून शासनाचा निषेध केला.

त्यावेळी जमलेल्या शेतकऱ्यांचा आक्रोश पाहता आले पावली मोजणी करीता आलेल्या महसूल अधिकाऱ्यांना आले पाऊली परत जावे लागले. त्यावेळी शेतकऱ्यांचा 'एकच नारा, समृद्धी महामार्ग रद्द करा' आणि मोजणीला विरोध करून शेतकऱ्यांनी रस्ता रोको



आंदोलन सुरू केलं जेव्हा पर्यंत शासन आम्हा शेतकऱ्यांशी स्वतः शेतकऱ्यांचीचर्चाकरणार नाही. तेव्हापर्यंत आम्हीशासनाला आपल्या शेतातली मोजणी करू देणार नाही अशी बतावणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली.

मी एक शेतकरी असून माझा व्यवसाय शेती आहे आणि माझं संपूर्ण कुटुंबाचे पोटपाणी शेती व्यवसायावर चालतो. माझी शेती समृद्धी महामार्गात जर गेली तर माझं संपूर्ण संसार उद्ध्वस्त होईल आणि या महामार्गाचा मला कसलाही फायदा नाही.

**जयपाल भांडारकर, शेतकरी पुत्र**

# आकडा टाकून वीज घ्याल, तर पोलिस कोठडीत जाल

आवाज भंडारा / प्रतिनिधी

**भंडारा :** लघु व उच्च दाबाचे वीज कनेक्शन घेतलेल्या ग्राहकांकडून वीज चोरी करण्याचे प्रकार प्रामुख्याने महावितरणच्या भरारी पथकांच्या तपासणीत समोर आले आहेत. आकडा टाकणे, मीटरमध्ये फेरफार करणे, घरगुती वीज कनेक्शन घेऊन व्यावसायिक वापर करणे, मीटरला बायपास करून परस्पर वीज कनेक्शन घेणे, अशा प्रकारे वीज चोरी केली जाते. या वीज चोरांचा महावितरणच्या भरारी पथकांकडून शोध घेऊन त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले जात आहेत.

३५२ वीज चोरी करणाऱ्यांवर महावितरणच्या भरारी पथकांकडून वर्षभर कारवाया झाल्या. जिल्हाभरातून वीज चोरी करणाऱ्या ३५२ जणांवर कारवाई करण्यात आली. त्यांच्यावर गुन्हे दाखल करून दंडात्मक कारवाई करण्यात आली.



**सर्वाधिक चोऱ्या मीटरमध्ये छेडछाडीतून**

ग्रामीण भागात तारेवर आकडा टाकून वीज चोरी करण्याचे प्रमाण सर्वाधिक दिसून येत आहे. त्याउलट, शहराच्या परिसरामध्ये मीटरवर लोहचुंबक ठेवून मीटरची गती कमी करणे, मीटर काढून त्यात फेरफार करणे, अशा पद्धतीने मीटरमध्ये छेडछाड करून वीज चोरी केली जाते.

**महावितरणला लावला ५७.९४ लाखांचा चुना**

महावितरणच्या भरारी पथकाने जिल्ह्यातील ३५२ वीज चोरांना पकडून त्यांच्यावर कारवाई केली. या कारवाईत तब्बल ५७.९४ लाख रुपयांची वीज चोरी करून महावितरणला चुना लावला आहे.

**६.३० लाखांची थकबाकी**

ग्राहकांना वीज चोरी केल्याप्रकरणी वीज कायदा २००३ च्या कलम १२६ व १३५ अन्वये बिल व दंडाच्या रकमेपैकी ६.३० लाखांची थकबाकी वसुली बाकी आहे.

**५१ लाख रुपयांची झाली वसुली**

जिल्ह्यात उच्च व लघु दाबाच्या वीज प्रवाहातून ३५२ ग्राहकांनी वीज चोरी केली होती. त्यापैकी वीज बिल व दंड मिळून ५१.६४ लाख रुपये वसूल करण्यात आले.

**पथके नियमित कार्यरत**

जिल्ह्यातील वीज चोरी रोखण्यासाठी अधीक्षक अभियंता कार्यालयांतर्गत येणा□या दोन विभागांमध्ये भरारी पथके नियमित कार्यरत आहेत. या भरारी पथकांच्या माध्यमातून वीज चोरी करणा□या ग्राहकांवर कारवाई करण्यात येते. त्याचबरोबर त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले जात आहेत. थकबाकीदार तसेच वीज चोरीत अडकलेल्या ग्राहकांनी दंड व बिल तातडीने भरावे आणि कारवाई टाळावी.

**- राजेंद्र गिरी, अधीक्षक अभियंता, महावितरण, भंडारा.**

# खेळामध्ये चमकणार त्याला शिवछत्रपती पुरस्कार मिळणार; तुम्हीही करू शकता अर्ज !

आवाज भंडारा / प्रतिनिधी

**भंडारा :** राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा□या व्यक्तींना शासनाच्या क्रीडा विभागाद्वारा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. सन २०२३-२४ यावर्षीच्या पुरस्कारासाठी राज्यातील क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, दिव्यांग खेळाडू व साहसी उपक्रमात सहभागी झालेले खेळाडू, व्यक्ती यांच्याकडून २६ जानेवारी २०२५ पर्यंत ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. शासनाने शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी सुधारित नियमावली तयार केली आहे.

उल्लेखनिय कायार्साठी होणार सन्मान

ज्येष्ठ क्रीडा महर्षीकरिता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शकांकरिता उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार खेळाडू, साहसी उपक्रम, दिव्यांग खेळाडू आणि महिला क्रीडा मार्गदर्शक, असे पुरस्कार प्रदान



करण्यात येतात.

सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंच्या सन्मानासाठी...

क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणा□या ज्येष्ठ क्रीडा महर्षी, क्रीडा मार्गदर्शक यांचा सन्मान करण्याच्या अनुषंगाने शासनाच्या क्रीडा विभागातर्फे हा पुरस्कार देण्यात येत असतो.

**अर्ज भरण्यासाठी नियम व अटी काय ?**

तीन वर्षात खेळाडूने राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवर उत्कृष्ट कामगिरी बजावलेली असावी. अर्जात तसा उल्लेख असणे अत्यंत आवश्यक आहे.

**अर्ज भरण्याला सुरुवात**

१४ जानेवारीपासून ऑनलाइन अर्ज करण्यास सुरुवात झाली आहे.

**क्रीडा पुरस्काराचे स्वरूप काय ?**

विजेत्यांना स्मृतिमानचिन्ह व प्रमाणपत्र तसेच पन्नास हजार रुपये मानधन दिले जाते. शासकीय तथा निमशासकीय अधिकारी व कर्मचारी पात्र ठरल्यास पंचवीस हजार मानधन, एसटीचा परवाना दिला जातो.

जिल्ह्यात या पुरस्कारांसाठी जनजागृती करण्यात येत आहे. पात्रताधारक क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी उपक्रम व दिव्यांग खेळाडू यांनी क्रीडा विभागाच्या ऑनलाइन संकेतस्थळावरून २६ जानेवारीपर्यंत ऑनलाइन अर्ज करावा.

**- लतिका लेकुरवाळे, जिल्हा क्रीडा अधिकारी, भंडारा.**

# शाळकरी वाहने मुलांसाठी धोकादायक !

## विदर्भ माहिती अधिकार संघटनेकडून कारवाईची मागणी

आवाज भंडारा / प्रतिनिधी

**भंडारा :** नियमबाह्य शाळकरी वाहने मुलांसाठी धोकादायक असल्याने कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी विदर्भ माहिती अधिकार संघटनेच्या पदाधिका□यांनी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजेंद्रकुमार वर्मा यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

शेकडो स्कूल बसेस, ओमनी व्हॅन्स व रिक्षा शाळकरी मुलांच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येतात, मात्र यापैकी अनेक गाड्या नियमांना फाटा देत आहेत. सध्या अनेक बसेस व वाहने फिटनेस सर्टिफिकेट व इन्शुरन्स शिवाय रस्त्यावर धावत आहेत. काही वाहनांचे इन्शुरन्सही कालबाह्य झाले आहेत. परमिट एका शाळेसाठी असताना गाड्या इतर शाळांसाठी वापरण्यात येतात. याशिवाय, स्पीड लॉक तोडून गाड्या ७०-८० च्या वेगाने चालवल्या जात असल्याची माहिती समोर आली आहे. शिष्टमंडळात संघटनेचे प्रवीण मेहर, भविश नागपुरे, सचिन हटवार, अमित खैरकर, अतुल गणवीर, मिथुन बोरकर



आदींचा समावेश होता.

**अशा आहेत मागण्या**

शाळांनी परिवहन समिती स्थापन करणे बंधनकारक असले तरी, अनेक शाळा या बाबीकडे दुर्लक्ष करत आहेत. अशा स्थितीत विद्यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात आहे. तात्काळ तपासणी व कडक कारवाई करण्यात यावी. तसेच सर्व शाळांनी परिवहन समिती स्थापन करून आरटीओ कार्यालयात अहवाल सादर करावा.

मुलांच्या सुरक्षेला मोठा धोका

ओमनी व्हॅन्स व रिक्षामध्ये क्षमतेपेक्षा जास्त मुलांची वाहतूक केली जात आहे, ज्यामुळे मुलांच्या सुरक्षेला मोठा धोका निर्माण होत आहे. तसेच, काही वाहनांमध्ये मुलांना चक्क सीएनजी टाकीवर बसवले जात आहे.

# जड वाहतुकीसह अतिक्रमण विरोधात जनआक्रोश आंदोलन

आवाज भंडारा / प्रतिनिधी

**तुमसर :** शहरात रोजच्या रोज अपघात घडत असून नुकताच बसस्थानकासमोर कौशल्या दहाट महिलेच्या जीव गेला तर दोन दिवसांनी भरधाव वेगाने आलेल्या रेतीच्या अवैध टिप्परने पंचफुला कटरे महिलेच्या हात निकामी झाला. त्यामुळे त्या महिलेची प्रकृती चिंताजनक असूनत्या रुग्णालयात उपचार घेत आहे.

दिवसेंदिवस अश्या अपघाताचे प्रमाण वाढले जात असल्यामुळे तुमसर येथील नगरपालिका मुख्य प्रवेशद्वारासमोर सर्वपक्षीय आंदोलन करण्यात आले यामध्ये तहसीलदार मोहन टिकले, पोलीस निरीक्षक संजय गायकवाड व नगरपालिकेचे मुख्याधिकारी जुम्मा प्यारेलाले यांना अपघातासंदर्भात जाब



विचारला गेला. यात शहरातील योग्य उपाययोजना करण्याचे मागण्या करण्यात आले. यामध्ये शहरात जड वाहने वाहतूक यांची वेग मयार्दा कमी करण्यात यावे. शहरातील मुख्य रस्त्यावर बॅरिकेट करण्यात यावे.

अवैध रेती वाहतूक व अदानी राखेचा वाहतूक करण्याचा निर्धारित वेळ निश्चित करावे. नगरपालिका मुख्याधिकारी तुमसर यांनी गावातील रस्ते अतिक्रमणे मोकळे करावे. शाळेतील विद्यार्थ्यांना मुख्य रस्त्यावरून जाताना वाहतूक पोलिसांनी उपस्थित राहावे प्रवासी वाहतूक वाहने व बसस्टॉप समोरील वाहनांच्याही स्पीड मयार्दा निश्चित करण्यात यावा. १०, १२ आणि २० चक्के अवजड वाहने शहरात प्रवेश निषेध करावे बायपास रस्ता मेहंगाव रोड-खापा रोड रस्ता तात्काळ बनविण्यात यावा.खापा- रामटेक रोड वरील हसारा मार्गे कटंगी रोडला वाहतूक सुरू करावे तसेच शहरातील मुख्य मार्गावरील खड्डेमय रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करावे या सर्व मागण्या ताबडतोब पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली यावेळी प्रशासनाने वरील सर्व मागण्या मान्य केले असून यावर अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहे. त्यामुळे जन आक्रोश आंदोलन स्थगित करण्यात आले. यादरम्यान आंदोलन कर्त्यांना ताब्यात घेऊन नंतर सोडण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष अभिषेक कारेमोरे, अमर रगडे, शिवसेनेचे विभागप्रमुख अमित मेश्राम, माजीनगरसेविका सुरज भुरे, मिना गाढवे, बंदना आकरे, करुणा धुर्वे, नेहा मोटघरे, विजया चोपकर, माजी नगरसेवक बाळा ठाकूर, मेहताबसिंग ठाकूर, राजू गायधने, सलाम तुरक, कॉंग्रेसचे जितेंद्र बावनकर, प्रमोद कटरे, शैलेश पडोळे, निशिकांत पेठे, राजेश देशमुख, संदीप पेठे, अतुल कारेमोरे, गौरव नवरखेले, हेमंत मलेवार, विक्रम फुलवधवा, सुनील थोटे, पवन किरपाणे, दीपक लुटे. अमित लांजेवार, आलोक बन्सोड, अजय सहारे, राजेश अग्रवाल, अमर माधवानी, बंडू शर्मा, विक्रम लांजेवार, तिलक गजभिये, तोशलबुरडे, प्रतिकनिखाडे यासह मोठ्या संख्येनेनागरिकांची उपस्थिती होती.

# राजेदहेगाव गोवरी नदीतून बैलगाडीद्वारे रेतीतस्करी जोमात

आवाज भंडारा / प्रतिनिधी

**जवाहरनगर :** सध्या जिल्हाभरात मोठ्या प्रमाणात रेतीतस्करीत वाढ झाली आहे. नवनवीन शक्कलचे वापर करून रेतीतस्करी केली जात आहे. मागील काही दिवसांपूर्वी नागपूर विभागीय पोलीस आयुक्त यांनी विभागीय कार्यालयातील अधिका□यांचे ४ चमू तयार करून जिल्ह्यातील रेती तस्करीत वापर केल्या जात असलेले रेतीसह ९ ट्रॅक्टर पकडले. यात जवाहरनगर पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातून वाहतूक केले. आता असलेले ४ ट्रॅक्टर पकडून कार्यवाही केली गेली. या कार्यवाहीतून जिल्हा पोलीस यंत्रणा झोपेतून लगेच जागे झाली.

काही थातूरमातूर केलेल्या कार्यवाहीतत्काळपत्रकार परिषद घेऊन पुढे करण्याचे प्रयत्न केले गेले. त्यानंतर मात्र रेती तस्करी जैसे थे यावर येथून ठेपली आहे. महसूल विभागाची डोकेदुखी वाढली आहे. मात्र, याकडे दुर्लक्ष होत असल्याने शासनाच्या महसुलाला चुना लागत आहे.

हा सर्व प्रकार दिवसाढवळ्या सुरू असून राजेदहेगाव गोवरी मुख्य रस्त्यालगत मोठ मोठी रेतीचे ढिगारे तयार केल्याचे या रस्त्याने प्रवास करणारे नागरिकांच्या नजरेस पडतात. या बाबीकडे महसूल विभाग सहजतेने बघत असले तरी यात परसोडी व गोवरी तलाठी साज्यातील अधिका□याचे आशीर्वाद असल्याने यावर प्रश्न उपस्थित केला जात आहे. हागोरखधंदा मागील अनेक महिन्यांपासून सुरू आहे.

